# महिलांच्या सक्षमीकरणात स्वयं-मदत गटांच्या भूमिकेचा अभ्यास

संशोधक : **ऐश्वर्या हिरालाल कदम** शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

---

**सारांश**

महिला सक्षमीकरण हा सामाजिक आणि आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी स्वयंमदत गट (Self-Help Groups - SHG) प्रभावी साधन म्हणून उदयास आले आहेत. हे गट महिलांना आर्थिक स्थैर्य, कौशल्य विकास आणि सामाजिक सुधारणांसाठी संधी उपलब्ध करून देतात.स्वयंमदत गटांच्या माध्यमातून महिला बचत करू शकतात, लघु व्यवसाय सुरू करू शकतात आणि सूक्ष्म अर्थसहाय्य (Microfinance) मिळवू शकतात. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमतेत सुधारणा होते आणि समाजातील त्यांचे स्थान उंचावण्यास मदत मिळते. या गटांच्या मदतीने महिलांना आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सहभाग वाढवण्याची संधी मिळते.या संशोधनात स्वयंमदत गटांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाचा आढावा घेतला आहे. महिलांच्या सक्षमीकरणात सरकारच्या योजना, धोरणे आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग.तसेच, या गटांसमोरील आव्हाने आणि त्यावर मात करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपाय यांचा विचार केला आहे. स्वयंमदत गट हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक प्रभावी माध्यम असून, ते त्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.

**प्रस्तावना**

सशक्तीकरण ही एक सक्रिय बहुआयामी प्रक्रिया आहे जी महिलांना जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांची ओळख आणि शक्ती ओळखण्यास सक्षम करते. सशक्तीकरण ज्ञान आणि संसाधनांमध्ये अधिक प्रवेश, निर्णय घेण्यामध्ये अधिक स्वायत्तता, त्यांच्या जीवनाचे नियोजन करण्याची अधिक क्षमता, जीवनावर परिणाम करणाऱ्या परिस्थितींवर अधिक नियंत्रण आणि रूढी, श्रद्धा आणि प्रथांपासून स्वातंत्र्य प्रदान करते. महिला सक्षमीकरण ही एक प्रक्रिया मानली जाऊ शकते ज्यामध्ये महिलांना संसाधने, भौतिक, मानवी आणि बौद्धिक संसाधने जसे ज्ञान, माहिती, कल्पना आणि आर्थिक संसाधने जसे की पैसा आणि निर्णयक्षमता, समुदाय, समाज आणि राष्ट्र यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सत्ता मिळविण्यासाठी अधिकाधिक नियंत्रण मिळवता येते. महिलांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बचत गट (SHG) मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. असे गृहीत धरले जाते की एकदा सामाजिक-आर्थिक सबलीकरण झाले की त्याचा परिणाम महिलांच्या सर्वांगीण विकासावर होईल.

भारतात, नाबार्डने 1986-1987 मध्ये बचत गटांची (SHGs) संघटना सुरू केली. परंतु खरा परिणाम 1991-1992 नंतरच दिसून आला जेव्हा SHG जोडणी कार्यक्रम विशेषतः बँकांसोबत सुरु करण्यात आला. SHG हा स्वेच्छेने तयार केलेला गट आहे ज्यामध्ये वेगवेगळ्या कुटुंबातील 10-20 महिला सदस्य असतात.मुळात, बचत गट एकसंध स्वरूपाचे असतात ज्या प्रमाणात सदस्य एकत्र येतात सामान्य समस्या आणि समस्यांचे निराकरण करणे. आकाराने लहानपणा आणि बचतीची संकल्पना जी स्वयंसहाय्यता गटांसाठी अद्वितीय होती, यामुळे विकासासाठी तयार करण्यात आलेल्या इतर गटांच्या उपक्रमांपेक्षा वेगळे बनले. बचतीची रक्कम कमी ठेवण्यात आली होती आणि ती दरमहा रु.20-150/- च्या मर्यादेत होती. एकत्रित केलेली सामान्य संसाधने सदस्यांमध्ये क्षुल्लक व्याजदराने फिरवली गेली. कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट SHG संकल्पनेच्या संभाव्यतेचा उपयोग करून गरीबांच्या दारापर्यंत सेवा पोहोचवणे, विशेषत: औपचारिक वित्तीय संस्थांकडून दुर्लक्षित झालेल्या महिलांच्या दारापर्यंत पोहोचवणे हे होते.नाबार्ड व्यतिरिक्त विविध स्वयंसेवी संस्था (एनजीओ) देखील इतर विकसनशील देशांच्या धर्तीवर SHGs ला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना बँकांशी जोडण्यात उत्प्रेरक भूमिका बजावतात, आक्रमकपणे आर्थिक मध्यस्थीचा पाठपुरावा करतात. ते महिलांना एकत्र आणतात, त्यांना संकल्पना समजावून सांगतात, त्यांना प्रेरित करतात आणि पटवून देतात आणि शेवटी त्यांना स्वयंसहाय्यता गटांमध्ये संघटित करण्यात मदत करतात. ते उपस्थित राहतात आणि सुरुवातीच्या काही गट बैठकांचे समन्वय साधण्यात मदत करतात, त्यांना खाती राखण्यात मदत करतात आणि त्यांना बँकांशी जोडतात. सूक्ष्म-कर्जामध्ये मध्यस्थ म्हणून अशासकीय संस्थांच्या भूमिकेचा महिलांवर सकारात्मक प्रभाव पडतो, कारण त्यांनी मालमत्ता निर्मिती, उत्पन्न निर्मिती, आपत्कालीन मदतीची तरतूद आणि महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नाचे साधन विकसित करून त्यांच्या स्वावलंबनाला प्रोत्साहन देण्याद्वारे गरीबांची असुरक्षितता कमी करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. स्वयं-सहायता गटांची निर्मिती हा शेवटी सूक्ष्म-कर्ज प्रकल्प नसून ती एक सक्षमीकरण प्रक्रिया आहे. कुटुंब, शेजारी, समाज आणि शेवटी संपूर्ण राष्ट्राच्या विकास प्रक्रियेत महिलांना सहभागी करून घेण्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज खूप मोठी झाली आहे. महिला सशक्तीकरण त्यांना ज्ञान

आणि कौशल्ये देऊन त्यांना सक्षम बनवते आणि त्यांना त्यांच्या घरातील कामांच्या पलीकडे उत्पन्न मिळविण्यासाठी काम करण्याची संधी प्रदान करते. या संकल्पनेचा उद्देश महिलांचे सक्षमीकरण करणे आणि अशा प्रकारे त्यांच्या कुटुंबांना दारिद्र्यरेषेच्या वरती उन्नत करणे हा आहे. असे दिसून आले आहे की बहुसंख्य ग्रामीण स्त्रिया ज्या स्वयंसहायता गटाशी सक्रियपणे आणि सकारात्मकपणे संलग्न आहेत त्या स्वतःला सक्षम बनवण्यात यशस्वी होतात.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणात स्वयंमदत गटांचा कसा प्रभाव पडतो याचा अभ्यास करणे.
2. महिलांच्या सक्षमीकरणात सरकारच्या योजना, धोरणे आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग अभ्यासणे.
3. महिला सक्षमीकरणामध्ये स्वयंमदत गटांना येणाऱ्या अडचणी ओळखणे आणि त्यावर उपाय सुचवणे.

**संशोधनाची प्रक्रिया :**

**संशोधनाचा नमुना :**

सध्याच्या अभ्यासासाठी संशोधकांनी तुळजापूर शहरातील महिला स्वयंमदत गटातील ( महिला बचत गट) सभासद महिला सदस्याची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे. ह्या निवडीसाठी यादृच्छिक नमुना तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे

**संशोधन पद्धत :**

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान स्थितीशी निगडीत आहे.म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे.

**माहितीचे संकलन :**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी माहिती संकलनाचे प्राथमिक स्रोत वापरण्यात आले आहेत. यामध्ये तुळजापूर शहरातील महिला स्वयंमदत गटातील (महिला बचत गट) सभासद महिला सदस्याकडून प्रश्नावली सोडवून घेण्यात आले आहेत.


**संशोधन प्रक्रिया :**

सदर संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आणि सदर संशोधनाची उद्दिष्टपूर्ती पुढील प्रमाणे करण्यात आली.

1. **महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणात स्वयंमदत गटांचा कसा प्रभाव पडतो याचा अभ्यास करणे.**


सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रश्नावली साधनाचा वापर करण्यात आला.

**आलेख क्र १**





आलेखावरून असे दिसून आले की ६०% महिलांनी होय आणि ४०% महिलांनी नाही म्हटले. यावरून असे दिसून येते की बचत गटात सामील झाल्यापासून कमाई करायला सुरूवात करणाऱ्या महिलांची संख्या जास्त आहे.

**आलेख क्र. २**




आलेखावरून असे दिसून आले की ९०.५% महिलानी बचत गटात सामील झाल्यानंतर मासिक ५००० रु पेक्षा कमी कमाई केल्याचे सागितले ,तर ९.५% महिलानी बचत गटात सामील झाल्यानंतर मासिक ५००० रु ते १०,००० रु दरम्यान कमाई केल्याचे सांगितले.

**आलेख क्र. ३**





आलेखावरून असे दिसून आले की ८६.४% महिलांनी होय आणि १३.६% महिलांनी नाही म्हटले आहे यावरून असे दिसून येते की बचत गटामार्फत कर्ज घेणाऱ्या महिलाची संख्या जास्त आहे.

**आलेख क्र. ४**





आलेखावरून असे दिसून आले की महिलांनी बचत गटातून जी रक्कम कर्जाचा स्वरुपात घेतली त्याचा वापर सर्वात जास्त ३१.८% व्यवसाय गुंतवणूक व घर दुरस्ती यासाठी वापरली १८.२% इतर साठी वापरली त्यामध्ये लग्न, अचानक येणारे खर्च यासाठी तर ९.१% मुलांचे शिक्षण आणि आरोग्य खर्च यासाठी वापरले.

**आलेख क्र. ५**





आलेखावरून असे दिसून आले की ७१.४% महिलांनी होय आणि २८.६% महिलांनी नाही म्हटले आहे यावरून असे दिसून येते की बचत गटात सामील झाल्यानंतर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र वाटणाऱ्या महिलाची संख्या जास्त आहे.

**आलेख क्र. ६**





आलेखावरून असे दिसून आले की १००% महिलांनी होय आणि ००% महिलांनी नाही म्हटले आहे.बचत गटाचा भाग असल्याने महिला मध्ये निर्णय घेण्याचा आत्मविश्वास वाढला आहे.

**आलेख क्र. ७**





आलेखावरून असे दिसून आले की ४५% महिलांना बचत गटामध्ये सामील झाल्यानंतर समाज आणि कुटुंब यांचा कडून मिळणारया वागणुकित सकारात्मक बदल झाला आहे, तर ४५.५% महिलांना बचत गटामध्ये सामील झाल्यानंतर समाज आणि कुटुंब यांचा कडून मिळणारया वागणुकित कोणताही बादल झाला नाही तर ९.१% महिलांना बचत गटामध्ये सामील झाल्यानंतर समाज आणि कुटुंब यांचा कडून मिळणारया वागणुकित नकारात्मक बदल झाला आहे.

**आलेख क्र. ८**




आलेखावरून असे दिसून आले की ६८.२% महिलांनी होय आणि ३१.८% महिलांनी नाही म्हटले आहे यावरून असे दिसून येते की बचत गट कार्यक्रमामधून काही नवीन कौशल्ये शिकणाऱ्या महिलाची संख्या जास्त आहे.

**आलेख क्र. ९**





आलेखावरून असे दिसून आले की ५७.१% महिलांनमध्ये नेतृत्व आणि सवांद कौशल्ये आत्मासात झाले,३३.३% महिलांनमध्ये आर्थिक साक्षरता कौशल्ये, तर ९.५% महिलांनमध्ये इतर कौशल्ये आत्मासात झाले आहेत.

**2. महिलांच्या सक्षमीकरणात सरकारच्या योजना, धोरणे आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग अभ्यासणे.**


सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रश्नावली साधनाचा वापर करण्यात आला.

**आलेख क्र. १०**





आलेखावरून असे दिसून आले की ७२.७% महिलांना बचत गटासाठीच्या सरकारी योजनाची माहिती काही प्रमाणात आहे.१८.२% महिलांना बचत गटासाठीच्या सरकारी योजनाची पूर्णपणे माहिती आहे,तर ९.१% महिलांना बचत गटासाठीच्या सरकारी योजनाची माहिती नाही आहे.

**आलेख क्र. ११**





आलेखावरून असे दिसून आले की ४५.५% महिलांना राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान(NRLM) या बचत गटाशी संबंधित योजनाचा फायदा झाला आहे.२७.३% महिलांना इतर योजना यामध्ये १३.६% महिलांना मुद्रा कर्ज योजना या बचत गटाशी संबंधित योजनाचा फायदा झाला आहे,तर १३.६% महिलांना या बचत गटाशी संबंधित योजनाचा काहीही फायदा झालेला नाही आहे.

**आलेख क्र. १२**




आलेखावरून असे दिसून आले की ८६.४% महिलांना बचत गटाशी संबंधित योजनाबदलची माहिती बचत गटाचा बैठकामध्ये कळाली.तर सरकारी कार्यालये, स्वयंसेवी संस्था,सोशल मीडिया आणि इतर माधमातून महिलांना बचत गटाशी संबंधित योजनाबदलची माहिती प्रमाण कमी आहे.

**आलेख क्र. १३**





आलेखावरून असे दिसून आले की ४५.५% महिलांना आर्थिक पाठिब्याचा अभाव असल्याने सरकारी योजनामध्ये प्रवेश मिळावण्यात आव्हानांना तोड द्यावे लागते.३६.४% महिलांना जागरूकतेचा अभाव असल्याने बचत गटाशी संबंधित योजनामध्ये प्रवेश मिळावण्यात अडचणी येतात तर १८.२% महिलांना गुंतागुंतीची प्रक्रिया असल्याने बचत गटाशी संबंधित योजनामध्ये प्रवेश मिळावण्यात अडचणी येतात.

**3. महिला सक्षमीकरणामध्ये स्वयंमदत गटांना येणाऱ्या अडचणी ओळखणे आणि त्यावर उपाय सुचवणे.**


सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रश्नावली साधनाचा वापर करण्यात आला.

**आलेख क्र. १४**



आलेखावरून असे दिसून आले की ५९.१% महिलांना त्यांचा बचत गटात निधीचा अभाव हे आव्हान वाटते. १८.२% महिला त्यांचा बचत गटात इतर आव्हानाना सामोरे जात आहेत.१३.६% महिलांना प्रशिक्षण संधीचा अभाव हे त्यांचा बचत गटात इतर आव्हानाना सामोरे जात आहेत. ९.१% महिलांना कमी समुदाय आधार ह्या आव्हानांना तोड द्यावे लागत आहे.

**आलेख क्र. १५**




आलेखावरून असे दिसून आले की ५४.५% महिलांनी बचत गट प्रगतीसाठी कर्ज आणि आर्थिक मदत प्रक्रिया सुलभ करणे हे सुधारणा सुचवली आहे. २७.३% महिलांनी सरकारी मदत आणि अनुदान वाढवणे तर १८.२% महिलांनी अधिक प्रशिक्षण आणि कौशल्ये विकास कार्यक्रम आयोजित करणे हे सुधारणा सुचवले आहेत.

**प्रमुख शोध**

- आलेख क्र.३ आणि आलेख क्र.४ नुसार असे दिसून आले की बचत गटामार्फत कर्ज घेणाऱ्या महिलाची संख्या जास्त आहे.तर महिलांनी बचत गटातून जी रक्कम कर्जाचा स्वरुपात घेतली त्याचा वापर सर्वात जास्त व्यवसाय गुंतवणूक व घर दुरस्ती यासाठी केला आहे.
- आलेख क्र.५ नुसार असे दिसून आले की बचत गटात सामील झाल्यानंतर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र वाटणाऱ्या महिलाची संख्या जास्त आहे.
- आलेख क्र.६ असे दिसून आले की १००% महिलांनी होय उत्तर दिले आहे. त्यानुसार बचत गटाचा भाग असल्याने त्या महिला मध्ये निर्णय घेण्याचा आत्मविश्वास वाढला आहे.
- आलेख क्र.७ असे दिसून आले की ४५% महिलांना बचत गटामध्ये सामील झाल्यानंतर समाज आणि कुटुंब यांचा कडून मिळणारया वागणुकित सकारात्मक बदल झाला आहे, तर ४५.५% महिलांना बचत गटामध्ये सामील झाल्यानंतर समाज आणि कुटुंब यांचा कडून मिळणारया वागणुकित कोणताही बादल झाला नाही.
- आलेख क्र.९ नुसार असे दिसून आले की ५७.१% महिलांनमध्ये नेतृत्व आणि सवांद कौशल्ये आत्मासात झाले,३३.३% महिलांनमध्ये आर्थिक साक्षरता कौशल्ये आत्मासात झाले आहेत.
- आलेख क्र.१० नुसार असे दिसून आले की ७२.७% महिलांना बचत गटासाठीच्या सरकारी योजनाची माहिती काही प्रमाणात आहे.१८.२% महिलांना बचत गटासाठीच्या सरकारी योजनाची पूर्णपणे माहिती आहे,तर ९.१% महिलांना बचत गटासाठीच्या सरकारी योजनाची माहिती नाही आहे.
- आलेख क्र.१३ नुसार असे दिसून आले की महिलांना सरकारी योजनामध्ये प्रवेश मिळावण्यासाठी आर्थिक पाठिंब्याचा अभाव आणि योजने बद्दल जागरूकतेचा अभाव हे सर्वात माठे आव्हानांना वाटते.
- आलेख क्र.१४ नुसार असे दिसून आले की महिलांना त्यांचा बचत गटात निधीचा अभाव हे सर्वात मोठे आव्हान वाटते. त्यानंतर प्रशिक्षण संधीचा अभाव आणि त्यानंतर त्याचा इतर समस्या.
- आलेख क्र.१५ नुसार असे दिसून आले की महिलांनी बचत गट प्रगतीसाठी कर्ज आणि आर्थिक मदत प्रक्रिया सुलभ करणे , सरकारी मदत आणि अनुदान वाढवणे तर अधिक प्रशिक्षण आणि कौशल्ये विकास कार्यक्रम आयोजित करणे हे सुधारणा सुचवले आहेत.

**निष्कर्ष**

महिला बचत गट महिलांच्या जीवनात खूप महत्त्वाची भूमिका बजावतो गरीब आणि अशिक्षित महिलांना फायदे देऊन त्यांचे जीवन अधिक सोपे आणि विश्वासार्ह बनवतो आणि महिलांना आधार आणि स्थिरता प्रदान करतो. महिला बचत गटाचा

उद्देश गरिबी कमी करणे हा आहे. प्रत्येक महिला स्वतंत्र व्हावी आणि खऱ्या अर्थाने त्याचं सक्षमीकरण व्हावे आणि महिलांना आत्मविश्वासाने पाठिंबा मिळावा हे महिला बचत गटाचे उद्दिष्ट आहे.

**संदर्भ सूची**

1. Rai .P. (2019),A Study of Bachat Gat and Women Empowerment in Nagpur City.
2. अहमद, बी., आणि शेट्टी, एसएस (२०२०). बचत गट: भारतातील महिला सक्षमीकरणाचे एक साधन.
3. कुमार, एस., आणि सिंग, ए. (२०१८). स्वयं-मदत गटांद्वारे ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणावरील अभ्यास.